# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.08.2024** **वारःशनिवार**

---

1. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज संस्थगित; वक्फ सुधारणा विधेयकाच्या परीक्षणासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना
2. भारतीय रेल्वेच्या आठ नवीन रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी: महाराष्ट्रातील जालना-जळगाव- 174 किलोमीटर लांबीच्या प्रकल्पाचा समावेश
3. नीट पीजी परीक्षा लांबणीवर टाकायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
4. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यात हर घर तिरंगा अभियानाचा प्रारंभ; येत्या स्वातंत्र्यदिनापर्यंत विविध उपक्रमांचं आयोजन आणि
5. जागतिक आदिवासी दिन राज्यात विविध उपक्रमांनी साजरा

**संसद**

संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज काल निर्धारित वेळेच्या दोन दिवस अगोदर संस्थगित करण्यात आलं. गेल्या महिन्यात 22 तारखेला सुरु झालेलं संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं कामकाज येत्या सोमवारपर्यंत निश्चित करण्यात आलं होतं. दरम्यान, बँकिंग कायदे सुधारणा विधेयक 2024 काल लोकसभेत केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी मांडलं. या विधेयकात प्रचलित कायद्यात सुधारणा सुचवित कामकाजात सुलभता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रेल्वे सुधारणा विधेयक 2024 काल लोकसभेत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सादर केलं. या विधेयकात रेल्वे कायदा 1989 मध्ये सुधारणा सुचविण्यात आल्या असून या विधेयकामुळे रेल्वे बोर्डाची शक्ती वाढेल आणि रेल्वेची कार्यक्षमता सुधारेल, असं वैष्णव यांनी हे विधेयक सदनामध्ये मांडताना सांगितलं. लोकसभेत काल वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक 2024 चा अभ्यास करण्यासाठी 21 सदस्यांच्या संयुक्त संसदीय समितीची स्थापना करण्यात आली. ही समिती पुढील अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटच्या दिवशी लोकसभेला आपला अहवाल सादर करेल, असं संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी यावेळी सांगितलं.

**फडणवीस**

महाराष्ट्रातही वक्फ बोर्डाच्या माध्यमातून कॉँग्रेसच्या नेत्यांनी हजारो एकर जमिनी लाटल्या आहेत. म्हणूनच संसदेत ही मंडळी विधेयकाला विरोध करत आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ते काल पुण्यात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.

**रेल्वे-केंद्रीय मंत्रिमंडळ**

आर्थिक व्यवहार-विषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीनं रेल्वे मंत्रालयाच्या आठ प्रकल्पांना काल मंजुरी दिली. यासाठी 24 हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे. यामध्ये महाराष्ट्रातील जालना-जळगाव- 174 किलोमीटर

लांबीच्या प्रकल्पाचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांपैकी एक असलेल्या 'अजिंठा लेणी', भारतीय रेल्वे जाळ्याशी जोडल्या जाणार आहेत.

**नीट पीजी**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची नीट पीजी परीक्षा लांबणीवर टाकण्याची मागणी करणारी याचिका काल सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली. ही परीक्षा उद्या, रविवारी ११ ऑगस्ट रोजी होणार आहे. या परीक्षेकरता अनेक उमेदवारांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून दूरवरची किंवा अतिशय गैरसोयीची केंद्र मिळाली असल्याचं याचिकेत म्हटलं होतं. परंतु, या कारणासाठी सुमारे दोन लाख परीक्षार्थींचं भविष्य पणाला लावता येणार नाही, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठाने स्पष्ट केलं.

**तिरंगा अभियान**

नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी कालपासून देशात 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' अभियानाला सुरुवात झाली. ऑगस्ट क्रांतीदिन ते स्वातंत्र्यदिन या कालावधीत अर्थात 15 ऑगस्टपर्यन्त हे अभियान राबविण्यात येणार आहे. प्रत्येकानं घरावर तिरंगा फडकवून या मोहीमेला पुन्हा एकदा लोकचळवळ बनवण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशाद्वारे केलं आहे.

दरम्यान, घरोघरी तिरंगा हे अभियान, स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्याग आणि बलिदानाची जाणीव करून देईल. यावर्षी राज्यातल्या अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकावला जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. काल मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून या अभियानाला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. हा आपला राष्ट्रीय सण असून यात सर्वांना सहभागी करुन घेण्याचं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध जिल्हा प्रशासनांना दूरस्थ माध्यमातून केलं आहे. त्या अनुषंगानं पुणे महानगरपालिकेच्या वतीनं तिरंगा फेरी, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा प्रतिज्ञा यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आणि अनेक अभिनव उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यातील सर्व नागरिकांनी आपापल्या घरावर 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट या कालावधीमध्ये तिरंगा ध्वज फडकवावा, असं आवाहन पुणे महापालिकेनं केलं आहे.

घरोघरी तिरंगा अभियानाला राज्यात अन्यत्रही उत्साहात सुरुवात झाली आहे. या अभियानाच्या निमित्तानं धुळ्यात दुचाकी फेरी; वाशिममध्ये सायकल फेरी; तर नांदेड जिल्ह्यात काल तिरंगा फेरी काढण्यात आली. धाराशिव जिल्ह्यातील ग्रामीण भागात 80 हजार तर शहरी भागात एक लाख तिरंगा ध्वज वितरित केले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष यांनी दिली आहे. यासाठी जिल्ह्यातील महिला बचतगटांच्या माध्यमातून तिरंगा ध्वजाची निर्मिती करण्यात येणार असून उर्वरित ध्वज टपाल कार्यालय आणि खादी ग्रामोद्योग महामंडळाकडून घेतले जाणार असल्याचंही घोष यांनी सांगितलं.

**आदिवासी दिन**

निसर्गप्रेमी आदिवासींचा गौरव करण्यासाठी, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी दिवस आहे, असल्याचं प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित यांनी केलं. जागतिक आदिवासी दिनानिमित्त नंदुरबार इथं आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. आदिवासी विकास विभागाच्या

आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना बोलीभाषेतून शिकवण्यासाठीच्या पुस्तिकेचं प्रकाशन आणि आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी अर्ज करण्याची सुविधा सुलभ करणाऱ्या डिजीटल पोर्टलचं लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आलं.

पालघर जिल्ह्यात यानिमित्त भूमीसेना आदिवासी एकता परिषद आणि त्या अंतर्गत येणाऱ्या विविध आदिवासी संघटनांनी पदफेरी काढली. यावेळी आदिवासी बांधवांनी पारंपरिक तारपा लोकनृत्य सादर केलं. गोंदिया, चंद्रपूरसह गडचिरोलीतही आदिवासी दिनानिमित्त जनजागृती फेरी आणि अन्य कार्यक्रम झाले. हिंगोली जिल्ह्यात क्रांतीसुर्य बिरसा मुंडा चौक इथं आयोजित कार्यक्रमात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

**अटक**

आयसिसशी संबंधित दहशतवाद्याला दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकानं काल पुण्यातून अटक केली. रिजवान अली असं त्याचं नाव असून तो दर्यागंजचा रहिवासी आहे. राष्ट्रीय तपास संस्थेनं त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

**नागपंचमी**

सांगलीतल्या बत्तीसशिराळ्यासह राज्यात ठिकठिकाणी काल नागपंचमीचा सण उत्साहात आणि प्रतिकात्मक पद्धतीनं साजरा झाला. सापांविषयी समाजामध्ये पसरलेल्या विविध गैरसमजांबाबत अनेक सर्पमित्रांनी जनजागृती केली. धुळे जिल्ह्यातल्या निमगुळ इथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीनं भित्तीचित्रांद्वारे जनजागृती केली.

**हवामान**

कोकणात, विदर्भात बहुतेक ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकणात आणि घाट भागात तुरळक ठिकाणी-जोरदार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.